# लोहगड

## एक समाधानी प्रवास



लेखक - गणेश ढोले

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# लोहगड

(प्रवासवर्णन)

## लेखक : गणेश ढोले

# लोहगड

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# लोहगड

लेखक - गणेश ढोले

फोन नंबर - +91 9657961677

ईमेल – sahyadrivede@gmail.com

पत्ता – मु.पो. उद्धट, ता. इंदापुर, जि. पुणे, 413104

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ९ एप्रिल २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# लेखक परिचय




**नाव - गणेश सतीश ढोले**

पत्ता - मु.पो-उद्धट , ता.इंदापुर , जि.पुणे ४१३१०४

- ९६५७९६१६७७

- @ sahyadri_vede_

- sahyadrivede@gmail.com


# माझे वाचन -

वाचनाची आवड तशी अलीकडंच लागली. आर्मी मध्ये भरती झालो, सुरुवातीची अडीच वर्षे पुण्यातच गेली. पण जेव्हा पुणे सोडलं आणि मग वाचनातूनच आपला गाव(महाराष्ट्र) अस्वादु लागलो. आणि मग वाचनाचं महत्व पटू लागलं. निसर्ग, जंगल, जंगली प्राणी, डोंगर, दऱ्या खोऱ्या ह्यांची आवड तर होतीच पण घरापासून लांब गेल्यामुळं ह्या सगळयांची आठवण यायला लागली.

कारगिल मध्ये असताना एखाद्या विराण डोंगरावर कमीतकमी 15 दिवस ते जास्तीत जास्त 3 महिन्यापर्यंत राहावं लागायचं आणि त्या एकट्यापणात साथ द्यायची हि पुस्तक तिथंच जास्त वाचनाची आवड लागली. तिथंच एकदा बर्फ पडत असताना सगळे रस्ते बंद होते कोणाचीच ये जा होत नव्हती. तेव्हा मोबाईल मध्ये pdf स्वरूपात श्रीमानयोगी होतं. ते 1646 पानाचा पुस्तक मी ड्युटी करत चार दिवस आणि तीन रात्रीत वाचून काढलं. त्यानंतर मग हळू हळू जिम कार्बेट ची मॅन इटर्स ऑफ कुमाऊं, मॅन इटर्स ऑफ गढवाल अशी पुस्तक, डॉ. प्रकाश आमटेंची प्रकाशवाटा, नेगल, मारुती चित्तमपल्ली लिखित जवळ जवळ सगळी पुस्तक मी वाचून काढलीत

श्यामची आई, माझे सत्याचे प्रयोग, मृत्यूंजय असं वाचन केले आहे ज्या ठिकाणी वाचायला पुस्तक नव्हती उपलब्ध होत त्याठिकाणी **“esahity”** कामी यायचं. ज्या प्रकारे शारीरिक स्वस्थ राहण्यासाठी व्यायाम तसंच मानसिक स्वस्थ राहण्यासाठी वाचन खुप गरजेचं आहे.

आपल्याला निसर्गाने खूप काही दिलंय, आणि त्या बदल्यात आपल्यासाठी व पुढच्यापिढीसाठी संरक्षित आणि संवर्धित करून ठेवायचं आहे आणि त्यासाठी मला खारीचा वाटा उचलायचा आहे तेही आंतरसमाधान शोधत.....



# मनोगत

सह्याद्री...... ! नानाविध प्रकारची रूपे त्याची. अगदी असंच असतं काही व्यक्ती, वस्तू अथवा काही गोष्टिंच्या बाबतीत असच घडत त्या प्रत्येक वेळी वेगळया रुपात भासतात त्याबरोबर वेगवेगळे अनुभव देतात.

विविध अनुभव देणारे शिवविचारांचा वारसा लाभलेले गडकिल्ले जणू सह्याद्रीचा श्वासच. त्या श्वासातील फुंकर ज्याला समजली तो सह्याद्रीवेडा होणार हे नक्की. अशा सह्याद्रीतील एका समाधानी प्रवासाचे चित्र मांडण्याचा केलेला हा छोटासा प्रयत्न.

दोन दिवसांच्या प्रवासातील जगलेले किंवा अनुभवलेले अगदी छोटे-मोठे पैलू मांडण्याचा भटकंती वरचा हा माझा पहिलावहिला प्रयत्न. आणि या प्रयत्नाला लाभलेली " ई साहित्य प्रतिष्ठान " ने दाखवलेला विश्वास त्याचबरोबर टीम "सह्याद्रीवेडे" ची लाभलेली साथ या सर्वांचा मी आभारी आहे. चला तर मग पुन्हा एकदा जगूया सह्याद्री अगदी सह्याद्रीवेडे होऊन!

# अर्पणपत्रिका

हा अखंड  सह्याद्री ज्यांनी आमच्यासाठी संरक्षित आणि संवर्धित करून ठेवला अशा सर्व सह्याद्रीवेड्यानां अर्पण ........

- गणेश ढोले



# लो ह ग ड



सुट्यांच्या (सैन्यदलातून) सुरवातीलाच भंडारदरा हरिश्चंद्रगड, सांधन व्हॅली, कळसुबाई बघून झालं होतं. पण परत (सीमेवर) जायच्या अगोदर एखादी ट्रेक करावंसं वाटत होत म्हणून शनिवार आणि रविवार जायचं ठरवलं. त्यात आम्ही नवीन टेंट घेतले होते त्याच पण उदघाटन करायचं होतच. आणि ते टीम सह्याद्रीवेडे च्या “अभी नही तो कभी नही” ह्या घोषवाक्यानुसार तेव्हाच गरजेचं होतं. कावळागड आणि लोहगड ठरवलं पैकी लोहगड माहिती काढल्यावर करायचं ठरवलं आणि त्यात भाजे लेणी आणि विसापूर रस्त्यावरच आहे म्हणून ते पण ह्या मोहिमेत सामील करून घेतलं.

मला पुण्यात काम होतं म्हणून मी अगोदरच 1 दिवस येऊन थांबलो होतो 31 ऑगस्ट ला मयूर अमोल आणि सुमंत हे एका गाडीवरून बारामतीहून पुण्याला आले. हे चुकीचं होतं पण पर्याय नव्हता म्हणून करावं लागलं. सकाळी 10 वाजता आम्ही कात्रजला एकत्र जमलो, आणि

8 दिवस शांत असलेला पाऊस जणू त्याला पण आमच्या बरोबर लोहगड बघायचा म्हणून कि काय त्याने पण हजेरी लावली.

भंडारदरा मध्ये आम्ही नवीन रेनकोट घेतले होते. सुमंत आणि मयूर ने ते सोबत आणले होते. पण मी घाईगडबडीत ते विसरलो होतो आणि अमोलच पण तेच झालं होतं. पाऊस रिमझिम चालू होता थांबायचं नावच घेत नव्हता. पर्याय नव्हता म्हणून आम्ही पण त्यांच्यासोबतच जायचं म्हणून भिजतच निघालो. वारजे पाठीमागं टाकून आम्ही देहूकडे निघालो. पाऊस थांबला म्हणून त्या दोघांनी रेनकोट काढले पण दहा बारा किलोमीटर जातो न जातो तोच परत चालू झाला. असं दोन तीन वेळा फसवून झालं आणि NH4 ला लागल्यावर शेवटी पाऊस थांबला. मजल दर मजल करत आम्ही शेवटी कार्ल्याला पोहचलो. गावातून उजवीकडे एकविरा देवी आणि कार्ला लेणीकडे रस्ता जातो तर डावीकडे भाजेलेणी, विसापूर, लोहगड आहे.

उजवीकडे वळून आम्ही मळवली येथे आलो रेल्वे येणार असल्यामुळे फाटक लागलं होतं. उतरून थोडेसे पाय मोकळे केले. थोड्याच वेळात फाटकापाशी वाहनांची गर्दी झाली. सगळया पुणे आणि मुंबईतील लोकांच्या गाड्या होत्या. त्यांच्या बोलण्या आणि वागण्यावरून वाटत होतं की सगळे वीकएंड ला येतात आणि मज्जा मस्ती करून जातात. फाटक उघडल्यावर आम्ही रेल्वेरूळ पार करून मुंबई पुणे मेगा हायवे वरून भाजे लेण्याच्या दिशेने निघालो.



भाजेलेणी असलेली भाजे गाव ग्रामपंचायत सफाई कर घेते. आम्ही लेण्याच्या पायथ्याला पोहचलो लेण्यापर्यंत जायला बांधीव पायऱ्या आहेत. पायऱ्या जिथून सुरु होतात त्याच्या 100 मीटर अलीकडेच भाजे धबधबा आहे. एवढा मोठा नसला तरी पावसाळ्यात पाणी असत. एक कुटुंब धबधब्याखाली भिजत होतं. आम्ही आधीच पावसात भीजल्यामुळं धबधब्याखाली जायची आमची काडीमात्रही इच्छा नव्हती.

दुपारचे 1 वाजले होते. भूकही लागली होती. घरगुती जेवणाची सोय होते का बघावं म्हणून तिथल्या मक्याची कणसं विकणाऱ्यांना विचारलं. त्यांनी सांगितलं जेवणाला वेळ लागेल पण लोहगड पायथ्याशी जेवण ची सोय होईल म्हणून लेण्या बघून जायचं ठरवलं. तेवढ्यात तिथं गाडीवर 2 मुलं आणि 2 मुली आल्या आणि लेण्याबद्दल विचारू लागल्या. लेण्या बघण्यासाठी पायऱ्या चढून जावं लागेल म्हटल्यावर त्यांनी तोंड वाकडी करून एवढं चढण्यापेक्षा लोहगड बघू

म्हणून ते निघून गेली. हे सगळं बघून खरंच त्यांच्या तरुणपणावर कीव येत होती.....

आम्ही पायऱ्या चढायला सुरुवात केली थोडं वर गेल्यावर आभाळ मोकळं झाल्यामुळं एका किल्ल्याची तटबंधी दिसत होती. शेंगदाणे विकत असलेल्या आज्जीना विचारलं तेव्हा त्यांनी सांगितलं हा विसापुरचा किल्ला आहे. तिथून किल्ला खूप उंच वाटत होता. भाजे मार्गे पण किल्ल्यावर एक वाट जाते जंगलातून वर चढून गेल्यावर पण विसापूर किल्ल्यावर जाता येते. खूप उंची मुळे लोहगड करून किल्ला आज होईल का नाही ह्यात शंकाच वाटत होती. लेण्यांकडे जाणाऱ्या वाटेवर जास्त गर्दी वाटत नव्हती कदाचित पायऱ्या चढून जायचं आल्यामुळे किंवा त्या लेण्याबद्दल बहुतेकजणांना माहीतच नसणार...

लेण्या पर्यंत पोहचण्यागोदेर तिथं एक तिकीटघर लागत एका व्यक्तीला 50 रुपये असं तिकट तिथं आहे लेण्यांची साफसफाई आणि सुरक्षितता ह्यासाठी हे पैसे वापरले जातात डिफेन्समुळे त्यांनी माझं तिकिट घेतलं नाही पण बाकीच्यांचे तिकीट काढून आम्ही वर गेलो. गेटवर एक गार्ड असतो. तिकीट दाखवल्याशिवाय ती आतमध्ये सोडत नाही भाजे लेणी येथिल चैतगृह महत्वाचं आहे. ह्या लेण्या इ स वि पूर्व दुसऱ्या शतकात बांधायला चालू केल्या आणि इ स वि सहाव्या शतकापर्यंत लेण्यांची कोरण्याची प्रक्रिया चालू होती. फाटकाच्या आत गेल्यावर डाव्या बाजूलाच चैत्यगृह आहे. चैत्यगृहात पादत्राणे घालून प्रवेश नाही. पायऱ्यांच्या खालीच त्या काढाव्या लागतात. चैत्यगृहात

भिंतीना लागूनच दगडी खांब आहेत. आणि आतमध्ये शेवटी एक गोल स्तूप आहे. त्याची वरची गोलाई खरंच चकित करून सोडते. असं कोरीव



काम माणसाने हाताने केलं असेल ह्यावर विश्वासच बसत नाही. असलं सारखंच चैत्यगृह कार्ला लेण्यात पण आहे त्यावरून ह्या दोनही लेण्या समकालीन आहेत असं वाटतं. चैत्यगृहाच्या बाजूलाच दुमजली कोरीव काम केलेलं आहे. त्यातील दोनही मजल्यावर भिक्षूंसाठी राहण्यासाठी वेगवेगळया खोल्या आहेत. खोलीमध्ये बसण्यासाठी कट्टा आहे आणि समोरच्या भित्तीला एक कोरलेली जाळीदार खिडकी आहे. आणि जे सगळं हाताने कोरलेलं आहे.

लेण्यांमध्ये सगळेच काम कोरीव आहे. मानवाच्या बऱ्याच मुर्त्या त्यामध्ये कोरल्या आहेत. त्या वास्तूपासून पुढं गेल्यावर अपल्याला परत तीन छोट्या छोट्या आकाराचे स्तूप दिसतात. लेण्यांमधील सगळयात

जास्त मला आवडलेले खास वैशिष्ठ म्हणजे तिथल्या पाण्याच्या टाक्याचा व्यवस्थापन. लेण्यावर बरीच पाण्याची टाकी आहेत पाऊस आल्यामुळं ती पूर्ण काटोकाट भरलेली होती त्यामुळं त्यांची लांबी रुंदी आणि खोली समजत नव्हती. पण त्या पूर्ण दगडात कोरल्या होत्या. पाणी काढण्यासाठी व पाणी खराब होऊ नये म्हणून त्या टाक्यावर दोन फूट लांब आणि दोन फूट रुंद मोकळी जागा होती. टाक्यातलं पाणी एकदम स्वच्छ होतं अगदी लगेच हाताने प्यावं असं. आद्योगिकरणामुळं नद्यांची आणि ओढ्यांच्या पाण्याची झालेली हालत त्यापेक्षा हे असल पाणी बघितलं कि अजूनही नैसर्गिन पाण्याचे साठे आहेत म्हणून हायस वाटतं.



लेण्यावरून डाव्या बाजूला बघितलं कि अपल्याला विसापुरच्या किल्याची संरक्षण तटबंदी नजरेस पडते लेण्याच्या वरच्या बाजूने पण किल्यावर जायला पायवाट आहे. बरेच लोक भाजे लेणी ते विसापूर असा ट्रेक करतात. पाठीमाघ वळून बघितलं कि आपल्याला दिसत विसापूर गाव आणि कित्येक किलोमीटर असा सपाट प्रदेश शेतीसाठी जमीनीचे केलेले छोटे छोटे तुकडे आणि त्यावर हिरावा आणि पोपटी रंगाची पीक जशी कि जमिनीवर रंगाची शिपडनचं खेळू आहे. आत्ताच झालेल्या

पावसामुळे तर ते अजूनच उजळून दिसत होतं. हा सगळा परिसर बघितला कि मग समजत ह्या लेण्यांच महत्व. हे सगळं बघून मन एकदम प्रसन्न होतं. आणि आपोआपच एकाग्र होयला लागत. आणि मग सुरु होतो शोध स्वतःचा स्वतःतच. हि जागा भिक्षूंना तपश्चर्या करण्यासाठी एकदम अनुकूल असावी आणि म्हणूनच भाजे ह्या लेण्यांची निर्मिती झाली असावी. कारण आपण निसर्गाशी एकरूप झालो कि आपोआपच स्वतःशी एकरूप होतो. आणि ध्यानधारणेसाठी हे खुप गरजेचं आहे.

तिथं एक परदेशी महिला लेण्या पाहण्यासाठी बघायला आल्या होत्या. त्यांचं ते नम्रतेने वागणं खूप आवडलं. आपल्या संस्कृतीचा त्यांनी केलेला आदर ह्याच्यावरूनच आपल्याला समजतं आपल्या ह्या वास्तूंचं महत्व आणि गरज. त्यांच्या ह्या आदरपूर्ण वागण्यामुळं आम्हीही त्यांचा आदर केला आणि आमच्यामुळं त्यांच्या बघण्यात कोणताही अडथळा येणार नाही ह्याची काळजी घेतली.

तिथं आणखी एक वेगळाच अनुभव आला. लेण्यांचा शेवटी एक वरच्या बाजूस जाण्यासाठी पायऱ्या आहेत तिथं वर ध्यानधारणेसाठी बनवलेल्या खोल्या आहेत. त्याच्याच शेजारी एक गार्ड मोबाईल घेऊन उभा होता. मी वर पायऱ्या चढुन जाण्यास सुरुवात केली तर त्याने मला वर येण्यास नकार दिला. मला समजलं नाही काय झालं पण काहीतरी वर असेल आणि त्यामुळं वर जाण्यास मनाई असेल म्हणून मी थांबलो. खालीच एक गार्ड बसला होता वर जाण्यास मनाई आहे का असा विचारलं असता त्याने सांगितलं तस काही नाही पण वर त्या खोलीत

एक जोडपं बसलं आहे, आणि तो त्यांच्यावर नजर ठेऊन उभा होता जर त्यांनी काही वेगळं करण्याचा प्रयत्न केला तर त्यांचा फोटो काढून खाली पाठवला जाईल आणि त्यांच्यावर कारवाई केली जाईल. हे जरा मला विचित्रच वाटलं त्यांना मी म्हटलं अगोदरच का नाही थांबवत ते जर तिथ बसलेत तर त्यांना सांगा कि तुमचं बघून झालं असेल तर खाली या दुसऱ्यांना बघायचं आहे आता जर मला ते बघायच असेल तर मी काय करू. तो गार्ड तिथं निरुत्तर झाला. मी हि त्यांच्याशी जास्त वाद घातला नाही. आमचं तिथं थोडसं चुकलंच त्यांना त्या बद्दल जाब विचारायला पाहिजे होता. पण ह्या घटनेबद्दल मनात खूप शंका कुशंका येत होत्या. ह्याच्याच विचार करत आम्ही गेटबाहेर आलो.

लेण्याखाली आल्यावर आम्ही सरळ लोहगडाकडे कूच केली. पाऊस थोडा थांबला होता पण आभाळी वातावरण कायम होतं. लेण्यापासून खाली उतरून पुढं आल्यावर एक तीव्र चढाईचा घाट लागतो. बहुतेक चार चाकी त्यावर चढत नव्हत्या म्हणून गाड्या घाटातच लावून लोक चालत जात होते. आम्ही गाडी तशीच




चालवत घाट चढला पण शेवटाला रस्ता कच्चा असल्यामुळं गाडीवरून उतरावच लागलं. घाट चढून पुढं गेलं की लोहगड काळया ढगांच्या आढुन डोकाऊच लागला होता. विसापुरला जाणारा रस्ता डाव्या बाजूला होता तिथून सरळ पुढं गेलं की लोहगडाच्या पायथ्याला पोहचलो. आता मात्र जेवण करणं गरजेचं होतं आणि म्हणूनच आम्ही जेवण करूनच गडावर जायचं ठरवलं. गडावर जाणाऱ्या पायऱ्या समोरच एक हॉटेल होतं. तिथं जेवणासाठी थांबलो घरगुती पद्धतीचं जेवणाच्या चार ताटची ऑर्डर दिली. घरगुती जेवण केल्याचे खूप फायदे आहेत. एकतर पिढ्यान पिढ्या तिथं राहणाऱ्या आणि त्या जागेच सादर्य जपणाऱ्या लोकांचा व्यवसायाची सोय होते. आणि हा आहार हि शरीरासाठी योग्य असतो. आणि मुख्य म्हणजे त्या त्या परिसरातील आपल्याला पदार्थ पण खायला मिळतात. हा माझा वैयक्तिक अनुभव आहे. जेवणाला 15 मी लागतील पण सगळं गरम गरम देतो असं काका म्हटले. त्यांना गडाविषय विचारलं कि वर राहण्याची सोय वैगेरे आहे का तर त्यांनी सांगितलं गडावर संध्याकाली सहा नंतर थांबून देत नाहीत. सहा नंतर गड पूर्ण खाली केला जातो. त्यांनी त्यांच्या घरापाठीमागे टेन्ट लावून राहू शकता असं सांगितलं. तस ती जागा पण वाईट नव्हती पाठीमागे चांगला नजारा होता. पण आम्हाला ते योग्य वाटलं नाही. पण त्याना विसापूर बद्दल विचारलं असता तिथं काही अडचण नाही तिथं तुम्ही राहू शकता असं त्यांनी सांगितलं.

तो पर्यंत तिकडं जेवण तयार झालं होतं. अगदी पंचपक्वान्नच ताट त्यांनी आणून ठेवलं होतं. वरण, भात, बटाट्याची भाजी, पिठलं, लोणचं ठेचा कांदा भजी आणि महत्वाचं म्हणजे तांदुळाची भाकरी एवढं सगळं त्या ताटात होतं. खाण्यासाठी कधीच न लाजनाऱ्या सह्याद्रीवेड्यानि त्यावर ताव मारला. पोटभर जेवण झाल्यावर गाड्या, हेल्मेट आणि बॅगा तिथंच ठेऊन आम्ही लोहगड चढायला चालू केला. गड चढायला चालू केला आणि पावसाने मला घेऊन चला म्हणत पुन्हा हजेरीं लावली. गड चालू झाला की पायऱ्यांच्या दोनीही बाजूला शेंगा, शेंगदाणे मक्याची कणसे विकाणाऱ्यांही रेल चेल होती. आणि तिथल्या शहरी माणसांच्या गर्दीमुळं हा



एक वीकएंड पॉईंट आहे असं समजून जात. पुणे आणि मुंबई च्या मध्ये असल्यामुळं निवांत आणि शांततेच ठिकाण असल्यामुळं शनिवार आणि रविवार इथं खूप गर्दी असते. अगोदर कुठंच न दिसलेली माकड पण इथं दिसत होती म्हणजे हे मानवप्राणी हमखास ह्याना काही न काही खायला देत असणारं हे नक्की होतं.

आम्ही पायऱ्या चढायला चालू केलं, पुढं गेल्यानंतर एक तिकीट घर लागत तिथ तिकीट काढून आम्ही पुढं निघालो. डाव्या बाजूला लोहगडविषयी माहिती, घ्यावयाची काळजी आणि गडाचा नकाशा असे बोर्ड आहेत. पायऱ्यांचा रस्ताही दाट झाडीतून जातो त्यामुळं चालायलाही छान वाटतं. गडावर जाण्यासाठी चार दरवाजे पार करून जावं लागतं पहिला दरवाजा म्हणजे गणेश दरवाजा. ह्या दरवाजाच्या आतील बाजूस शिलालेख कोरलेले आहेत. हा दरवाजा पार करून गेल्यावर समोरच पायरीवर खेकडोबाच दर्शन झालं पावसामुळे कदाचित ते बाहेर आले असावेत. पुढं गेल्यानंतर हनुमान दरवाजा लागतो ह्याच्या दोनीही बाजूस शारंभाच्या मुर्त्या कोरल्या आहेत. तो दरवाजा पार करून पुढं गेलं की लागतो महादरवाजा हा दरवाजा गडाचा मुख्य दरवाजा आहे ह्याच्यावर हनुमानाची मूर्ती कोरली आहे. पाऊसाची रिमझिम चालू होतीच त्यामुळं पायऱ्यांवरून पण पाणी वाहत होतं. धुकं आल्यामुळं गड



सोडून दुसरं काहीच बाहेरचं दिसत नव्हतं. तो दरवाज्या पार करून आम्ही गडावर पोहचलो.

तिथून खाली बघितलं कि आपल्याला गाड्याच्या चारही दारवाज्यामुळं तयार झांलेली नागमोडी वाट दिसते. ह्या चारही दरवाज्यातून येताना लोकांची वर्दळ जाणवत होती. आपलं शरीर वाचवत चढणारी आणि उतरणारी तसेच गड आपलाच आहे अश्या अविर्भावात असणारी आणि गड बघत बघत जाणारी हि मंडळी होती.



महादरवाज्यातून प्रवेश करताच डाव्या बाजूलाच चार तोफा पडलेल्या आहेत त्याला लागूनच लोहारखाना आहे त्याला लागूनच एक तोफ सिमेंट बांधकामात बसवली आहे ते का समजलं नाही पण. त्याच्या समोरच एक जुना चुन्याचा घाना आहे. तिथून डाव्या बाजूला गडाच्या किनाऱ्यावरून पायवाट जाते. ती पायवाट घोड्याची पागा, लक्ष्मी कोटी आणि मळवली दर्ग्याकडे जाते. तिथं ह्या सगळया नावांची पाटी पण लावली आहे आणि त्यावरच गडावरची वेळ पण लिहिली आहे. त्या

पायवाटेने पुढं गेल्यावर अपल्याला घोड्याची पागा लागते. पागा खूप मोठ्या आहेत आणि पूर्ण दगडात कोरलेल्या आहेत. पावसामुळं त्यात पाणी भरलं होतं आणि सूर्य प्रकाश नसल्यामुळं त्यात पूर्ण अंधार होता.

घोड्याच्या पागा समोरून पुढं चालत गेलं की एक छोटंसं पाण्याचं तळ लागत. पावसामुळं तळयात पाणी होतं आणि पाणी स्वच्छ होतं. तळया शेजारीच लक्ष्मी कोठी आहे कोठी आकाराने खूप मोठी आहे. तिचा



आतील गाभारा प्रशस्थ आहे त्याच्यात आत मध्ये एक खोली आहे. शिवाजी महाराजांनी जेव्हा सुरतेची पहिली लूट केली तेव्हा आणलेली पूर्ण लूट इथेच ठेवली होती त्यावरून लोहगडाच स्वराज्यातलं महत्व आपल्याला समजतं. त्या कोठीत दोन माणसं बसली होती त्यांना विचारल्यावर त्यांनी सांगितलं कि ते किल्ल्याची देखरेख करायला आहेत. आतमध्ये त्यांचं सामान पण पडलेलं होतं. लक्ष्मी कोठी खरंच खूप

आखीव आणि रेखीव कोरलेली आहे. बाहेर येऊन आम्ही पाच मिनिटं विश्रांती घेतली आणि पुढं चालायला सुरुवात केली.

पाऊस थोडासा ओसरला होता पुढं थोडस चालून गेल्यावर उजव्या बाजूला आणखी एक पाण्याचं टाक आहे. तिथूनच डाव्या बाजूला वळलं कि ती पायवाट सरळ विंचूकड्याला जाते. विंचूकडा चालू झाला की थोड्याच अंतरावर वाट लोखंडी पाईपणे बंद केली होती. पावसाळयात पाऊस व धुकं ह्यामुळं लांबच दिसत नाही म्हणून कदाचित हि वाट बंद केली असावी.



पुढं जाण्याचा मोह होत होता पण बंद असलेल्या ठिकाणी जण योग्य नव्हतं. आणि खरंच धुक्यामुळं खूप लांबच दिसत पण नव्हतं. म्हणून आम्ही समजदार सह्याद्रीवेडे मावळे बनून पाठीमागे फिरलो. आणि लोहगडात सगळयात महत्वाचं म्हणजे ठिकाण म्हणजे विंचुकडा राहून गेला.

विंचुकड्याकडून पाठीमागे आलो की उजव्या बाजूला वळून चालू लागलो. गड बघणाऱ्यांची संख्या पण तिथं वाढत होती. हलकासा पाऊस आणि जोरात वारा वाहत होता आणि त्यामुळं अंगात हुडहुडी भरली

होती. तिथून पुढं चालत आल्यावर तिथं आणखी 3 पाण्याची टाक लागली. पुढं आल्यावर बांधलेले एक पाण्याचं तळ आहे. त्या तळयाला सोळा कोण आहेत. म्हणून त्याला सोळाकोणी तळ पण म्हणतात. तळयात उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. आणि उजव्या बाजूला जास्त झालेले पाणी बाहेर जाण्यासाठी छोटा नाला आहे. हे तळ नाना फडणवीस यांनी बांधून घेतलं आहे, तळयाची बांधणी खुप सुरेख आहे. आणि तळयात पाणीही थोड्या फार प्रमाणात पावसामुळं स्वच्छ होतं. तळयाला उजवीकडून वळसा घालून पुढं आलं की एक महादेवाचं मंदिर लागतं. मंदिराला कळस वैगेरे नाही पण त्याच बांधकाम चालू आहे. मंदिराच्या च पाठीमाग एक पाण्याचं टाक आहे. त्या पाय वाटेनं पुढं चालत आल कि आपण परत महाद्वारापाशी पोहचतो. अश्या प्रकारे पूर्ण गड गोलाकार मध्ये बघून झाला. अश्या पद्धतीन गड बघितल्याचा फायदा असा होतो की सगळा गड आपण एकाच वाटेनं बघू शकतो परत त्याच वाटेवर यायची गरज पडत नाही. पण चुकल्यानंतर हा निर्णय खूप महागात पडू शकतो. गडावर बाघण्यासारखं खूप काही आहे आणि सगळं काही सुस्थित आहे. एवढ्या सगळया इतिहासाची साक्ष झालेल्याचा अभिमान वाटला.

आता वेळही खूप झाला होता. राहण्याचं ठिकाणही अजून पक्कं झालं नव्हतं त्यामुळं लगेच गड उतरायचं ठरवून निघालो. पाऊस आता थांबला होता गड उतरताना लोकांची गर्दी होती. छोट्या मुलांना आवरत

आणि सावरत माणसं चालली होती. पाऊस जरी थांबला असला तरी गडाच्या पायऱ्यांवरून पाणी वाहत होतं

गड उतरून बॅगा, हेल्मेट आणि गाड्या घेतल्या. रात्रीच्या जेवणाच काय करावं हे समजत नव्हतं पण विसापुरच्या पायथ्याला जेवणाची सोय होऊ शकते समजल्यावर तिथंच बघुयात म्हणून लगेच निघालो. भाजे गावाला जाणाऱ्या रस्त्यालाच एक किमी पुढं गेलं की उजव्या बाजूला विसापुरला रस्ता जातो. तिथून अर्धा किमी च्या आसपास गड आहे. पण रस्ता पूर्ण कच्चा आणि मातीचा आहे, पाऊस सारखा चालू असल्यामुळं रस्ता पूर्ण चिखलाने खराब झाला होता. मयूर आणि अमोल दोघही गाड्या घेऊन पुढं गेली आणि मी आणि सुमंत चालत पाठीमाघुन निघालो. पायथ्याशी पोहचल्यावर पहिल्याच घरापाशी थांबून जेवणाची चौकशी केली. तिथ दोघेजण नवरा बायको राहत होती. जेवण भेटलं असं म्हंटल्यावर त्यांना गडावर राहण्याची काय सोय आहे का विचारल. गडावर राहण्याची सोय आहे वर गेल्यावर एक धान्याचं कोठार आहे पण पाऊसामुळं त्यात पाणी असू शकत असं त्यांनी सांगितलं.

गडावर जाऊन जर राहण्याची योग्य सोय नसेल तर आपण माघारी येऊ शकतो एवढा वेळ आमच्याकडे शिल्लक होता. पण जातानाच आपण पूर्ण तयारी करून जाऊ असं ठरवलं. त्याना लगेच चहाची सांगितला चार पाण्याच्या बाटल्या दोन बिस्कीट ची पाकिटे घेतली. इथं जेवण

नको म्हणून आठ भाकरी, पिठलं, आणि ठेचा अशी त्यांना ऑर्डर दिली आणि आम्ही चहा घेत बसलो.



ते जोडपं राहत होतं ते घर खूप छान होतं. घरासमोर प्रशस्थ जागा होती. घराच्या तीनही बाजूने वऱ्हांडा होता. डाव्या बाजूला एक छोटासा स्विमिंग पूल होता आणि पाठीमाग दूरवर पवना धरणाचा पाणीसाठा दिसत होता. आणि समोर विशाल डोंगर ज्यावर विसापूरचा गड विसावला होता. गडाची तटबंदी पण दिसत होती तिथून. घराच्या चारही बाजूने तारेच कुंपण होतं. त्यांच्याकडे एक कुत्रा पण होता..... अगदी माझ्या स्वप्नातलं घर. अजून काय पाहिजे असत सुखी आयुष्य जगायला.

आता परत थोडा थोडा पाऊस चालू झाला होता. जेवण तयार झालं होतं ते घेतल. आणि त्यांच्याकडून त्यांचा मोबाईल नंबर आणि माचीस पेटी सुरक्षेसाठी घेतल. गाड्या बाजूला लावून आम्ही चार मावळे विसापुरच्या दिशेने निघालो

पाऊस आणि धुक्यामुळं सूर्य दिसत नव्हताच पण दिवस लवकर संपल्यासारखा वाटत होता.



सगळं सामान घेऊन आम्ही गडाकडे कूच केली पुढं गेल्यानंतर डाव्या बाजूला गडाकडे जाणारी पायवाट आहे. आणि त्याच्या डाव्या बाजूला तीन चार हॉटेल वजा घर होती. पायवाटेने चढायला चालू केल्यानंतर थोडंसं पुढं गेलं की एका झोपडीत छोटी छोटी लाकडं होती आणि त्या पूर्ण सुकलेल्या होत्या. एवढ्या रिमझिम पावसात गडावर सुक काही सापडणार नाही आणि गडावर गेल्यावर शेकोटीची गरज भासू शकते म्हणून अमोल ने त्यातली काही लाकडं सोबत घेतली. थोडंसं चालल्या नंतर पावसाने परत जोर पकडला. गडावर जाणाऱ्या पायवाटेच्या प्रत्येक वळणावर बाणाच्या खुणा केलेल्या आहेत.

वाटेत येताना आम्हाला गडावरून येणारे तीन जण दिसले. गड बघून ते उतरत होते. सागळयांसारखाच आम्हीही त्यांना अजून किती बाकी आहे असा केविलवाणा प्रश्न विचारला. गडावर राहायला जाणार

आहात का असं त्यांनी विचारल्यावर होकारार्थी मान हलवून आम्ही चढायला चालू केलं. रस्ता पूर्ण झाडीतून जात होता झाडांवर पडणाऱ्या पाऊसाचा आवाज येत होता.

पुढं आम्ही एका घळीपाशी पोहचलो. त्या घळीतूनच सरळ वर



चढायचं होतं. पावसाचा जोर वाढला होता आणि त्यात वरून येणार वाहत पाणी त्या घळीत येत होतं. त्यामुळं आता प्रवाहाच्या उलट्या दिशेने चढायला लागत होतं. एकतर सरळ चढाई आणि त्यात वरून पाऊस आणि पायाखाली वाहत पाणी त्यामूळ चालणं खुप अवघड जात होतं. प्रत्येक पाऊल हे जपून आणि खात्री करून टाकावं लागत होतं. दगडावरून आदळणाऱ्या आणि जंगलातून पावसाच्या पाण्याच्या आवाज हा मधुर येत होता. त्यामुळं हा सगळा त्रास जाणवतच नव्हता. थोडं उठत बसत विश्रांती घेत आमचं गड सर करणं चालू होतं.

धुक्यातून आता गडाची पडलेली तटबंधी दिसत होती ती बघून थोडं हायसं झालं. वर चढताना दगडात कोणाचा तरी बूट फाटलेल्या अवस्थेत टाकून दिलेला होता

त्याच्या नाड्या काढून घ्याव्यात असं वाटत होतं गडावर कश्याच्या तरी कामी येतील पण नको सोड म्हणून आम्ही पुढं चढू लागलो.



एका जागेवर विश्रांती घेत असताना मयूरने तोंड धुयायचा शहाणपणा केला आणि आमचं हसू अनावर झालं. नको ते शहाणपण नको करू म्हणून सगळ्यांना घेऊन पुढं चालू केलं.

आता ती तटबंदी स्पष्ट दिसायला लागली होती. गडावर राहायला असलेली गुहा हि ह्याच वाटेवर डाव्या बाजूला होती. जसजसं जवळ जाईल तस चढाई तीव्रच होत होती. पाणीही जास्त जोरात खालच्या

दिशेने वाहत होतं. ह्या सगळयांनाच विरोध करत आम्ही तटबंदीच्या डाव्या बाजूने गडावर पोहचलो. गडावर सुसाट्याचा वारा वाहत होता. पावसाच्या पाण्याच्या आवाजात मिळून तो आणखीनच भयानक वाटत होता. आणि त्यात रातकिड्यांचाहि आवाज मिसळत होता. गड बघण्याची आता वेळ नव्हती, जोराचा पाऊस, सुसाट्याचा वारा, आणि होत चाललेला अंधार त्यामुळे गड उद्या सकाळी बघू असं ठरवून आम्ही त्या गुहेचा शोध घ्यायला चालू केलं.

तटबंधी चढून वर गेलं की डाव्या बाजूला एक छोटा धबधबा आहे त्यालाच विसापुरचा धबधबा म्हणतात. त्याच्या बरोबर विरुद्ध बाजूलाच ती गुहा आहे. पूर्वी ह्या गुहेचा वापर धान्य साठवण्यासाठी केला जायचा, म्हणून तिला धान्य कोठार असं हि म्हटलं जायचं. गुहेत पाच सहा जण आरामशीर झोपतील एवढी प्रशस्थ जागा आहे. एकसारख्या पडणाऱ्या पावसामुळं गुहेत पाणी साठल होतं, त्या गुहेत राहण्याचा पर्याय संपाला होता. पण उन्हाळयात त्या गुहेचा राहण्यासाठी उपयोग होत असावा. कारण त्या गुहेत एक प्लास्टिकचा कागद आणि एक शेडनेट होतं. इथं राहायला आलेल्या लोकांनी ते परत घेऊन गेले नसावेत. पावसाचं आणि वरून जझिपणारं पाणी त्यावरहि होतं.

तोही पर्याय संपल्यामुळे गडावर दुसरीकडे कुठं राहण्याची सोय होते का ते बघणं गरचेच होतं. ते बघण्यासाठी आम्ही पुढं जायचं ठरवलं.

गुगलबाबा गडावरील बाकी जागांची माहिती देत होता गडावर हनुमान मंदिर गणेश मंदिर शिव मंदिर अशी बरीच मंदिरे दिसत होती त्यातच घळीच्या समोर असलेल्या गणेश मंदिराजवळ रहायचं असं आम्ही ठरवलं आणि गवतातून चालायला सुरुवात केली आत्ता अंधारही खूप पडला पाऊसाबरोबर वाऱ्याचा वेगही वाढला होता चालत चालत आम्ही त्या घळीच्या तोंडापाशी गेलो पन त्या मंदीराजवळ काहीही दिसत नव्हतं डाव्या बाजूला एक सलग अशी 4 ते 5 पाण्याची टाक होती आणि पाऊसामुळे त्यात काळ पाणी होतं टेन्ट वॉटरप्रूफ होते पण एवढ्या खुल्या जागेत लावणं शक्य नव्हतं आणि पावसाचा जोर वाढला तर पाणी



आतमद्धे येण्याची शक्यता होती त्यामुळे दुसरी जागा बघणं गरजेचं होतं आम्ही उभे राहिलो होतो तिथून डाव्या बाजूला पाण्याच्या टाक्याच्या वरच्या बाजूला मोकळया जागेत विसापुर वाडा म्हणून दाखवत होतं आणि उजव्या बाजूला झाडीमद्धे शिवमंदिर. मयूर आणि सुमंतला तिथेच थांबवून अमोलला ते शिवमंदिर बघून यायला लावलं आणि त्या वाड्यामद्धे राहण्याची व्यवस्था होते का ते पाहायला मी गेलो.

पाण्याच्या टाक्यापासून वर चढून गेल्यावर गवतातून तो दिसत होता खेकड्यांनी केलेल्या छोट्या छोट्या बिळावर पाय ठेवल्यावर त्यातून पाणी वरती येत होतं. पायाखाली काय येईल हे सांगू शकत नव्हतो. आत्ता भीती वाटत होती पटापट चालत त्या जागेवर पोहोचलो. चारही बाजूला भिंत व आत जाण्यासाठी एक दरवाजा होता पण छत मोकळा होता आणि खालचा भाग दगडांनी बांधला होता त्यामुळे थोडं पाणी साठल होतं पण इथे टेन्ट लावायला पाऊस सोडला तर काहीच अडचण नव्हती



भिंतीच्या कडेला टेन्ट लावल्यामुळे येणाऱ्या पाऊसापासून संरक्षण होणार होतं. मला ही जागा राहण्यायोग्य वाटली. मी माघारी मयूर आणि सुमंत असलेल्या ठिकाणी आलो अमोल पण तेथे आला त्याने सांगितलं की मंदिर छान आहे त्यावर छत सुद्धा आहे पण अडचण अशी

होती की पावसाचे पाणी मंदिरात शिरले होते आणि पिंड असल्यामुळे व्यवस्थित जागा पण नव्हती तिथे जवळ म्हैशी असल्याचे त्याने सांगितलं

तिथे पाणी असल्यामुळे आम्ही वाड्यातच रहायचं ठरवलं. मग आम्ही तिथे पोहोचलो सामान आतमध्धे ठेवलं. सगळीकडे ओलसर होतं. मग मला त्या गुहेत बघितलेल्या प्लास्टिक कागदाची आठवण आली. तो कागद आणल्यावर त्याचा फायदा होणार होता. सुमंत आणि मयूर ला मी ती खोली पूर्णपणे व्यवस्थित तपासायला लावली कारण पाऊसामुळे साप विंचू असण्याची शक्यता नाकारता येत नव्हती

आम्ही दोघेही तो कागद आणण्यासाठी निघालो. त्या गुहेच्या बाजूला पडका वाड्याचे अवशेष होते. तिथे रहायला जागा पहिली. पण खूप पडझड झालेली दिसली. आणि कुठेच जागाही मोकळी नव्हती. चालत आम्ही त्या गुहेजवळ पोहोचलो

तिथे जवळ असलेल्या धबधब्याचे पाणी वाढलं होतं. त्याचा आवाज पण खूप येत होता. त्या कागदाबरोबर शेड नेट पण उपयोगी येईल म्हणून त्या दोन्ही गोष्टी घडी करून घेतल्या. तेव्हा मला त्या फाटलेल्या बुटाची आठवण आली त्याची लेस काढून घेतली असतीस तर बरं झालं असतं असं वाटलं. पण आत्ता त्या घळीतून जाणं अवघड होतं त्या दोन्ही गोष्टी घेऊन आम्ही माघारी निघालो. मॅप वरं मी एक हनुमान मंदिर पण पाहिलं होतं. ते पण समोर दिसलं. तिथे पण आम्ही राहण्यायोग्य जागा भेटते का पाहिलं.

अमोल आणि मीच तिथे जायचं ठरवलं 200 मीटर अंतरावर गेल्यावर तिथे बघितलं तर पाण्याची 3 टाकी होती आनी त्या मधल्या टाक्याच्या पाठीमागील भिंतीवर हनुमानाची मूर्ती कोरली होती आणि त्याला पूर्ण शेंदूर लावला होता तिथली व्यवस्था राहण्यासारखी नव्हती कारण कि स्वतः हनुमान जी अर्धे पाण्यात होते थोडस पुढे जाऊन आम्ही तट बंदी वरून लोहगड पहिला. आत्ता सगळे पर्याय संपले होते. म्हणून आत्ता त्या वाड्याशिवाय पर्याय नव्हता. आम्ही जेव्हा परत वाड्याजवळ गेलो तेव्हा सुमंत आणि मयुर आमचीच वाट बघत होते. उशीर झाला म्हणून ते आमच्यावर रागावले होते. प्लास्टिकचा कागद टेंट खाली अंथरून शेड नेट दरवाज्याला लावू म्हणजे एखादं जनावर आत येऊ शकणार नाही असं सुमंत म्हटला आणि आम्ही तसं करायचं ठरवलं.

प्लास्टिक चा कागद दुहेरी घडी घालून खाली अंथरला. मयूर मी आणि अमोल टेंट लावयला चालू केलं. पाऊस रिमझिम पडत होता आणि बाहेर हवा पण खूप चालू होती. पाठीमागच्या भिंतीला चिकटून आम्ही समोरासमोर टेंट लावले. तोपर्यंत सुमंत बाहेरील दगडाचे गोटे आतमध्ये आणू लागला. त्याला ते का आनले असं विचारलं असता तो म्हणे कि जरी कोण आलं तरी आपल्या रक्षनासाठी असावेत म्हणून आणलेत. त्यावर आम्ही सगळे खूप मोठ्याने हसलो. पण ते गरजेचं होतं. कोणाचं माहित नाही, पण गडावर म्हैशीचा आवाज येत होता आणि गडावर डुक्कर किंवा रानटी कुत्री असण्याची श्यक्यता होती.

टेंन्ट लावून झाल्यावर आतील शेडनेटला सुमन्तच्या बुटाच्या नाड्या सोडून बांधल्या. (असल्या कामात नेहमीच सुमंतचा बळी दिला जातो)नंतर दरवाजाच्या दोन्ही बाजूला दगड ठेऊन आम्ही बनावटी दरवाजा बनवला आत्ता सगळं सेट झालं होतं.

बॅगा टेन्ट मद्धे घेऊन मी आणि मयूर एका व दुसऱ्या टेंन्ट मद्धे सुमंत आणि अमोल असं रहायचं ठरवलं. ओले कपडे व रेनकोट पावसापासून संरक्षणासाठी टेन्ट वर टाकले.

खालून आणलेले जेवण जेवण्यासाठी आम्ही दुसऱ्या टेन्टमद्धे एकत्र बसलो. उजेड करण्यासाठी घरून आणलेली टॉर्च चालू केली पण तिचा उजेड हातभर पण पडत नव्हता. मग लक्षात आलं की आपण ती आदल्या दिवशी वापरली होती. आणि ती परत चार्जिंग करायची राहून गेली. टेंटमध्ये शिरताना आतमध्ये किडे वैगेरे येऊ नयेत म्हणून लगेच चैन बंद करत होतो पण जेवायला बसल्यावर बेडकाचं एक पिल्लू समोर उड्या मारायला लागलं ते कसं आत आलं माहित नाही पण त्याला बाहेर काढणं गरजेचं होतं मग त्याला हलक्या हाताने बाहेर काढलं आणि मग आणलेल्या बेसन भाकरीवर जो ताव मारला तो सांगण्याच्या पलिकडे. भूक जास्त लागल्यामुळे १० भाकरी कमी पडली

जेवण झाल्यावर जरा जास्तच थंडी वाजू लागली मग शेकोटी पेटवायची ह्या विचाराने आम्ही टेंटच्या बाहेर आलो. पण खरी गंमत अशी की त्या माचीस मद्धे फक्त चार काड्या शिल्लक होत्या. आत्ता एवढ्यात पाऊस वारा आणि ओलावा यांचा सामना करून शेकोटी

पेटवणं अवघड होतं. पण प्रयत्न करायचा ठरवलं. पहिल्या तीन कांड्यावर मी आणि शेवटी अमोलने प्रयत्न करूनपण काही फायदा झाला नाही. शेवटी न पेटलेली शेकोटी तशीच सोडून आम्ही गडावर फिरायला बाहेर आलो बाहेर मळवली स्टेशनवरील रेल्वे हॉर्न चा आवाज येत होता कड्यावर जाऊन आम्ही NH4 हायवे बघितला गाड्यांच्या प्रकाशामुळे पूर्ण रस्ता प्रकाशमय दिसत होता आणि गडद अंधारामुळे ते दृश्य आणखीनच छान दिसत होतं

आत्तापर्यंत भयानक वाटणारी शांतता पाऊस आणि थंडी आत्ता छान वाटत होती. त्या संपूर्ण किल्ल्यावर फक्त आम्ही चौघेच होतो आणि सगळं शांत शांत होतं. मानवनिर्मित शहरांपेक्षा कितीतरी पटीने इथे खूप छान वाटत होतं.

इथे मोठे मोठे आवाज नव्हते, प्रकाश नव्हता. स्वतःला शोधण्यासाठी एकरूप होण्यासाठी सगळं पूरक असं वातावरण होतं. बाहेर बसण्याची खूप इच्छा होती. पण दिवसभराचा प्रवास आणि पडणारा पाऊस यामुळे शरीर थकल्यासारखं झालंतं म्हणून आम्ही लगेच टेंट मद्धे शिरलो.

सकाळी उठून बूट तपासून घाला (साप विंचू वैगेरे यात असण्याची शक्यता असते म्हणून) रात्री एकटं बाहेर येऊ नका अशा एकमेकांना सूचना देत आम्ही पडलो होतो आणि पडल्या पडल्या किल्ल्याचा इतिहास आठवत होता ह्या किल्ल्याने कधीकाळी किती वैभव ऐश्वर्य संपन्न काळ बघितला असेल त्याचबरोबर किती थरारक लढाया

बघितल्या असतील आम्ही झोपलो होतो त्या वाड्याने काय काय बघितले असेल त्या प्रत्येक घटनेस तिथला दगड आणि भिंत साक्षीदार असेल नाही का.........

विचार करता करता झोप लागली ती कुंभकर्णाचीच.

रात्रीचा पाऊस कमी जास्त होत होता पण झोप व्यवस्थित झाली सकाळी सहा वाजता उठलो अपेक्षेपेक्षा रात्र खूप छान गेली होती टेंट आवरून तो प्लास्टिकचा कागद आणि शेडनेट व्यवस्थित घडी घालून त्या वाड्याच्या कोपऱ्यात ठेवलं नंतर जरी कोणी कॅम्पिंग साठी आले तरी त्यांना ते उपयोगी यावं नंतर सोबत आणलेल्या सगळया गोष्टी अगदी प्लास्टिक ची बॅग पाण्याच्या बाटल्या सगळया गोष्टी घेऊन आम्ही नको असलेला परतीचा प्रवास चालू केला



धबधब्या जवळ आल्यावर आम्ही तोंड धुवून आलेल्या घळीच्या रस्त्यातून गड उतरायला चालू केलं पाऊस जरी थांबला असला तरी पाणी वाहन चालू होतं पाण्याचा आवाज मंद प्रकाश अशी सकाळ यामुळे वातातवरन अगदी प्रसन्न झालं होतं गड उतरून आम्ही गाड्या लावल्या त्या घराजवळ आलो तेही नुकतेच उठले होते तिथे चहा घेऊन आम्ही त्या जोडप्याचा निरोप घेतला.



लोहगडाच्या पायथ्यापासून विंचुकडा उजव्या बाजूला सोडत आम्ही घाट उतरायला चालू केला आत्ता आम्हाला पवना धरणाकडे जायचं होतं जाताना वाटेत...... खिंडीत थांबलो.

खिंड तशी खूपच छान होती पावसामुळे सगळी खिंड हिरवीगार झाली होती जसा कि भितींला



फिक्कट हिरवा रंग दिलाय अगदि तशीच दिसत होती छोट्या छोट्या गावतांनी आणि राहिलेली जागा शेवालाने घेतली होती तिथे थोडा वेळ थांबून पवना धरणाकडे निघालो सेलिंग गेम मुळे पवना बरोबर जुनी ओळख होती धरणाच्या बाजूला घाट उतरत असताना रस्त्याच्या उजव्या बाजूला एक गृहस्थ ध्यानाला बसले होते पवना डॅम मागे टाकून आंम्ही तिकोनाच्या पायथ्याशी पोहोचलो तिकोना पेठ गावी नाश्ता करून पुढचा प्रवास चालू केला



पुढे आम्ही पौड या गावी पोहोचलो तिथं एक गोष्ट मनाला खूप लागून गेली. रस्त्याच्या एका बाजूला दोरीवर चालण्याचा मुलगी खेळ करत होती. तिचे वडील ढोल वाजवत होते आणि ती मुलगी हातात काठी घेऊन त्या दोरीवर आपला तोल सांभाळत होती. आम्ही तिथे न थांबता निघून गेलो. परंतु परत ती गोष्ट मनाला लागली. अशा ठिकाणी थांबून त्यांच्या कलेला दाद देणं आपलं काम असतं, पण वेळे अभावी आम्ही तेथे न थांबता आमचा प्रवास व्यवस्थित पूर्ण केला.

ज्या पद्धतीने हा प्रवास आम्ही जगलो तो आपणापुढे मांडण्याचा हा केलेला छोटासा प्रयत्न. आशा करतो की आपणास यातून खूप काही अनुभवायला मिळेल. या छोट्या प्रयत्नावरील प्रतिक्रियांची वाट पाहतोय

गणेश ढोले

फोन नंबर - +91 9657961677

ईमेल – sahyadrivede@gmail.com

पत्ता – मु.पो. उद्धट, ता. इंदापुर, जि. पुणे, 413104


Team सह्याद्रीवेडे
वेड निसर्गाशी एकरूप होण्याचं

दुर्ग दुर्घट भारी

आसेतूहिमाचल

सुंदर हा देश

त्या सुंदर यात्रेसाठी

www.esahity.com वर महाराष्ट्र, भारत व जग प्रवासाची अतिशय सुंदर प्रवासवर्णनं आहेत. तुमच्याआमच्यासारख्या लोकांनी आपापले प्रवास अनुभव शब्द आणि छायाचित्रांतून मांडले आणि पाठवले. ई साहित्यच्या टीमने त्याची सजावट वगैरे करून त्यांना पुस्तकरूप दिलं. अशी शंभराहून अधिक पुस्तकं आता ई साहित्यवर आहेत. आणि ही संख्या काही हजारांत जाईल याची आम्हाला खात्री आहे. कारण...

कारण आपण लिहीणार आहात. आपण जिथे जिथे फ़िरायला जाल तिथले फ़ोटो व वर्णनं पाठवा. आपण जिथे रहाता त्या परिसरातील ठिकाणांचे फ़ोटो व माहिती पाठवा. भाषेची चिंता करू नका. बाकी सगळं आम्ही बघून घेऊ. याचा फ़ायदा त्या त्या ठिकाणाला भेट देणाऱ्यांना होईल. किंवा परदेशात राहणाऱ्या मराठी वाचकांना त्या जागेला भेट दिल्याचा आनंद मिळेल. किंवा प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरू न शकणारे जीव त्याचा आनंद घेतील. वाटा. आनंद वाटा. वाटा आणि वळणांचा आनंद वाटत रहा.

आपल्या लेखनाची मेल पाठवा.

esahity@gmail.com